<u>प्रेस नोट</u> दिनांक :- १४/१०/२०२६

पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई

बेकायदेशीर गांजा या अंमली पदार्थाची ओरिसा येथून आणून मुंबईमध्ये विक्री करणाऱ्या आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करुन अटक केल्याबाबत.

दिनांक १३/१०/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्ष, घाटकोपर युनिटच्या पथकाने गस्ती दरम्यान सांताक्रुझ चेंबुर लिक रोड ब्रिज जवळ, लोकमान्य टिळक टर्मिसनस रेल्वे स्थानका बाहेरील गार्डन जवळ, टिळकनगर, चेंबुर (प) मुंबई याठिकाणी अंमली पदार्थाची विक्री जवळ बाळगणाऱ्या इसमास ताब्यात घेवुन त्याच्या घेतलेल्या झडती मध्ये त्याचे ताब्यातून २२ किलो ९६० ग्रॅम वजनाचा 'गांजा' हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने त्याचे विरुद्ध अं.प.वि.कक्ष गु.र.क्र. ९५/२०२६ (टिळकनगर पो.ठा. गु.र.क्र. ५६६/२०२६) कलम ८(क) सह २०(क) एन.डी.पी.एस. कायदा १९८५ अन्वये गुन्हा नोंद करुन अटक करण्यात आली. नमूद अटक आरोपीताकडे केलेल्या तपासा दरम्यान त्याने सदरचा अंमली पदार्थ ओरिसा राज्यातून आणला असून तो विक्रीकरीता मुंबई आला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

<u>अटक आरोपी</u> - मनिषकुमार बैजनाथ चौधरी, वय २५ वर्षे

उपरोक्त नमुद आरोपीकडून २२ किलो ९६० ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ किं. अं. ११,४८,०००/- चा जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्रीमती पोर्णिमा चौगुले- श्रींगी, पोलीस उप आयुक्त, अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई व श्री. सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अंतर्गत घाटकोपर युनिटचे व.पो.नि. श्री. श्रीकांत आदाटे यांचे नेतृत्वात स.पो.नि. गणेश वाघ, पो.उ.नि. पंकज पाटील, पो.ह. गोरे, कानडे, यशवंते, रावते, शिंदे, गोमासे, पो.शि. पंडित, गर्जे, साठे, मपोह कोरपे, मपोशि मुलाणी, विशे, पोहचा घाडगे यांनी केली आहे.